जाहीर प्रकटन

पुणे महानगरपालिका,समाज विकास विभाग

**"पुणे मनपाच्या कोथरूड– बावधन क्षेत्रिय कार्यालयातंर्गत प्रभाग क्र. ११ मधील कै. मामासाहेब मोहोळ शाळा क्र. ९४ बी या शाळेच्या परिसरातील ग्रंथालय येथे अशासकिय/सामाजिक /स्वयंसेवी संस्था व पुणे मनपा (समाज विकास विभाग) यांच्या संयुक्त सहकार्याने प्रकल्प राबविणे करीता फेर स्वारस्य अभिव्यक्ती निविदा(EOI- Expression of Interest)मागविणे बाबत."**

पुणे महानगरपालिका समाज विकास विभागामार्फत विविध लोक कल्याणकारी योजना, उपक्रम, प्रकल्प, कार्यक्रम इत्यादी राबविण्यात येतात. **पुणे मनपाच्या कोथरूड– बावधन क्षेत्रिय कार्यालयातंर्गत प्रभाग क्र. ११ मधील कै. मामासाहेब मोहोळ शाळा क्र. ९४ बी या शाळेच्या परिसरातील ग्रंथालय येथे** अशासकिय/ सामाजिक/स्वयंसेवी संस्था व पुणे मनपा (समाज विकास विभाग) यांच्या संयुक्त सहकार्याने संयुक्त प्रकल्प राबविणेकरीता सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या नोंदणीकृत संस्थांमार्फत प्रकल्प राबविणे प्रस्तावित आहे. याकरीता सामाजिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या, नोंदणी प्रमाणपत्र असलेल्या विविध स्वयंसेवी संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. संस्थांकडून खालील निकष पूर्ण करणेत येत असल्यास त्यांना या उपक्रमा अंतर्गत प्राधान्य देण्यात येईल. कोथरूड– बावधन क्षेत्रिय कार्यालयांतर्गत प्र. क्र. ११ रामबाग कॉलनी, शिवतीर्थ नगर, कै. मामासाहेब मोहोळ शाळा क्र. ९४ बी या शाळेच्या परिसरातील ग्रंथायलयाचे क्षेत्रफळ १११.५२ चौ. मी. असून त्याचे मुल्यांकनानुसार र.रू.१७,९९२/–मासिक भाडे निश्चित केले आहे. ही वास्तू समाजोपयोगी कामाकरीता (ना नफा ना तोटा) अव्यवसायिक तत्वावर २.५% दराने भाडे आकारणी करून स्वयंसेवी संस्थेस विनियोगाकरीता ५ वर्ष कालावधीकरीता देणे आहे. यांचा तपशिल https://pmc.gov.in या संकेतस्थळावर मुख्य पृष्ठ "EOI" एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट या सदरा खाली उपलबध आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ६ मार्च २००८ पुणे महानगरपालिका मिळकत वाटप नियमावली मधील भाग १० – संयुक्त प्रकल्प अंतर्गत तत्सम इमारत ज्या वॉर्डत किंवा प्रभागात असेल अशा प्रभागातील / वॉर्डातील सामाजिक काम करणाऱ्या नोंदणीकृत संस्थेकडून अर्ज स्विकारून, अशा संस्थांना व्यवस्थापन व देखभाली साठी मा.स्थायी समिती मार्फत मुख्य सभेच्या मान्यतेने देता येतील. निवड झालेल्या संस्थेने या वास्तूच्या वापरापोटी (तीन महिन्याचे भाडे) अनामत रक्कम, तीन महिन्याचे आगाऊ भाडे व दरमहा मासिक भाडे भारणे अनिवार्य आहे.

संस्थांनी प्रस्ताव सादर करताना प्रस्तावामध्ये संस्थेचे नाव, संस्था चालक स्वतंत्र व्यक्ती आहे वा संचालक मंडळ आहे, संस्थेचे रजिस्ट्रेशन क्रमांक व दिनांक, संस्थेचे मागील तीन वर्षांचे ऑडिट अहवाल रिपोर्ट, स्वयंसेवी संस्थेचे चालू असलेले प्रकल्प, उपरोक्त बाबींच्या अनुषंगाने संस्थेने पुराव्याकरीता कागदपत्रे (अहवाल)सादर करावीत,सर्व कागदपत्रांवर संस्था चालकांची स्वाक्षरी, शिक्का व तारीख टाकणेत यावी.

पुणे मनपा हद्दीत संयुक्त प्रकल्प म्हणून संबंधित संस्था व पुणे महानगरपालिका, समाज विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सदर प्रकल्प राबविण्यात येणार आहे. यामध्ये मनपाचा सहभाग म्हणून फक्त जागा उपलब्ध करून देण्यात येईल. संबंधित स्वयंसेवी संस्थेच्या जबाबदाऱ्या खालील प्रमाणे असतील.

१. सदर वास्तूचे संपुर्ण व्यवस्थापन , दुरूस्ती विषयक कामे ही निवड झालेल्या संस्थेमार्फतच करणेत यावी.
२. प्रकल्पासाठी आवश्यक असलेले फर्निचर व्यवस्था, तद्नुषंगिक साधन–सामुग्री, प्रशिक्षित मनुष्यबळ इत्यादी बाबी संबंधित संस्थेने उपलब्ध करून द्यावयाचे आहेत.
३. सदर ठिकाणी प्रकाश व्यवस्था, पाण्याची व्यवस्था करणे, सदर मिळकतीची किरकोळ देखभाल दुरूस्ती करणे तसेच विविध सोयी व कोणत्याही प्रकारची देयक जसे की विज देयक अथवा इतर तत्सम देयक संस्थेमार्फत अदा करणे. .
४. पुणे मनपाकडे करार संपेपर्यंत वार्षिक संयुक्त प्रकल्प अहवाल प्रत्येक वर्षी सादर करणे.

तरी अशा प्रकारे संयुक्त प्रकल्प म्हणून चालविण्यास स्वारस्य असलेल्या स्वयंसेवी संस्थांनी आपले प्रस्ताव दि. 25/4/2023 पर्यंत कार्यालयीन वेळेत खालील ठिकाणी जमा करावेत. प्रस्तुत प्रकरणी प्राप्त होणारे प्रस्ताव कोणतेही कारण न देता नाकरण्याचे पूर्ण अधिकार मा.महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका अथवा त्यांचे मार्फत नियुक्त सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.

अर्ज जमा करणे व अधिक माहिती करीता संपर्काचे ठिकाण–
समाज विकास विभाग कार्यालय
तळमजला , मुख्य इमारत, मनपा भवन, शिवाजीनगर, पुणे –५
फोन नं.०२० – २५५०१२८२

सही/–
उप आयुक्त
समाज विकास विभाग,
पुणे महानगरपालिका

- सदरची तपशिलवार माहिती https://pmc.gov.in या संकेतस्थळावर मुख्य पृष्ठ "EOI" एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट या सदराखाली दि. 25/4/2023 पर्यंत पाहण्यास उपलब्ध आहे.